ISSN: 2393-8900 IMPACT FACTOR : 1.9152(UIF) VOLUME - 4 | ISSUE - 7 | MARCH - 2018

HISTORICITY RESEARCH JOURNAL

# सिंदखेड राजा येथील जाधव घराण्याची जल व्यवस्थापनाची उत्कृष्ठ व्यवस्था

**प्रा. डॉ. सिध्दार्थ शिवाजी वाठोरे**
**कला व विज्ञान महाविद्यालय कामरगाव ता. कारंजा जि. वाशिम.**

## प्रस्तावना :



आज संपुर्ण जगात जलव्यवस्थापना संदर्भात मोठ्या प्रमाणात जन जागृती मोहीम हाती घेतल्याचे दिसून येते. मात्र मध्ययुगीन भारतातील काही शासकानी ही व्यवस्था प्रत्यक्षात उतरवलेली दिसते. त्यामध्ये बुलढाण जिल्ह्यातील सिंदखेडराजा हे छत्रपती शिवाजी महाराजांच्या मातोश्री जिजाबाईचे जन्मस्थान असून या स्थळी त्याच्या पूर्वजांनी जलव्यवस्थापनाची अशी काही व्यवस्था करून ठेवली ती आजच्या काळातील शासकाना लाजवणारी अशी आहे. त्यांचा दृष्टीकोण हा समाजामुख होता. आपल्या प्रजेला फक्त पिण्याच्या पाण्याचीच व्यवस्था त्यांनी केली नाही, तर शेतीला सुध्दा पाणी देता यावे, त्या माध्यमातून आपल्या प्रदेशाची भरभराट करता यावी हा त्यामागील दृष्टीकोण होता त्यासाठी त्यांनी सिंदेखडराजा येथे मोतीतलाव, चांदणीतलाव, सजनाबारव, गंगासागर, बाळ समुद्र हे निर्माण करून या वास्तुच्या पाण्यावर नामांकीत आंबराया जगवल्या व आपला प्रदेश सुजलम सुफलम बनवला.

बुलडाणा जिल्ह्यातील सिंदखेड येथील जाधव घराणे हे देवगीरीच्या यादव घराण्यापैकी होय.[१] जाधव घराण्याकडे २७ महाल व ५२ चावड्यांची देशमुखी होती. निजामाच्या काळात जाधवांकडे पाच हजारांची मनसबदारी होती. त्याची निजामशाहीत प्रतिष्ठा इतकी वाढली की त्यांना 'राजे जाधवराव' म्हटल्या जात जसे.[२] सिंदखेडला लखुजी जाधव व आई म्हळसाबाई यांच्या पोटी १२ जानेवारी १५९८ साली जिजाऊचा जन्म झाला.[३] जिजाऊना दत्ताजी, अचलोजी, रघुजी आणि बहाद्दूरजी अशी चार भावंडे होती.[४] सिंदखेडराजामध्ये राजे लखुजी जाधवरावांनी बांधलेल्या राजवाडयातच जिजाबाईचा जन्म झाला. या राजवाड्याची बांधणी अप्रतिम आहे. या ठिकाणी सुद्धा जलव्यवस्थापनाची बाब दिसते. बांधकामाचा लक्षणीय भाग म्हणजे सात मजली तळघर त्या तळघराला पश्चिमेच्या अंगाने झरोके काढलेले आहेत. ते झरोके वरच्या मजल्यावरील चौकोनाच्या दिशेने उघडतात. चौकात त्यावेळी पाणी साठवून ठेवण्याची व्यवस्था केलेली आढळून येते या पाण्यावरून आत सरकणाऱ्या थंडगार हवेमुळे तळघर थंडगार राहत असे, विशेषत: येथे चौकातील पाण्यात कारंजे लावले असत. तात्पर्य असे की, तत्कालीन वातानुकलीन रचना म्हणून त्याकडे पाहिले जात असे हे विशेष लक्षणीय समजले पाहिजे.[५] अशी उत्कृष्ठ पाण्याचे व्यवस्थापन पाण्याचे केल्याचे दिसून येते.

**१) मोती तलाव :-** मोती तलाव म्हणजे शिवकालीन विदर्भातील जलयांत्रिकीचा एक उत्कृष्ठ नमुना आहे. या तलावाचे बांधकाम राव जगदेवाने केले असुन तो बांधण्यासाठी चार लक्ष रूपये खर्च आला. हा तलाव बांधण्याचा महत्वाचा उद्देश या भागातील शेतीला पाणी देण्यासाठी होता. कारण या तलावातुन बाहेर काढलेला दांड हा आज सुद्धा सुस्थीतीत आहे.[६] स्थापत्य कलेच्या दृष्टीने फार महत्वाचा आहे. तलावाची भिंत पक्क्या ताशीव दगडांनी बांधलेली आहे. बांधण्यासाठी वापरलेला दगड जुन्या हेमाडपंती मंदीराच्या बांधकामातील दिसतात. मंदीराच्या कोरीव खांबाचे तुकडे लावलेले दिसतात. काही दगडावर शिल्पकृती कमळे कोरलेली आहेत. पश्चिमेकडून पाण्याच्या बाजुला बऱ्याच देखण्या स्त्रीमुर्ती पहायला मिळतात. तलावात चार विहिरी खोदलेल्या असुन बुरूजही दिसतात. तलावातील पाणी सोडण्यासाठी जलद्वाराची निर्मीती केली आहे. पाण्याच्या पातळी वरून दोन जलव्दारे निर्माण केले व त्या पाण्याचा वापर शेतीला पाणी पुरवठा करण्यासाठी केला जात होता.

**२) चांदणी तलाव :-** चांदणी तलावाचे बांधकाम राव जगदेवाने केले. हा तलाव अंडाकृती आकाराचा आहे. तलावाच्या मध्यभागी मजबूत दगडी चौथऱ्यावर दुमजली विटांची इमारत आहे. या इमारतीला सहा कमानी आहे. वरच्या मजल्यावर जाण्यासाठी जिना आहे. चांदणी तलाव ही राव जगदेवाच्या नौकाविहाराची जागा होताी. अल्हाददायक चांदण्या रात्री चांदणी तलावात चांदणी महालाचे प्रतिबींब पडलेले व सजणीसह राव

जगदेव नौका विहार करीत असलेले हे दृश्य कल्पनेनेच रंगवता येईल, या तलावातून राजवाड्यात पाणी नेण्यासाठी दगडी नळाची योजना केली होती. आजही या दगडी नळाचे फुटलेले अवशेष क्वचित पहायला मिळतात.[७]

**३) सजना बारव :-** चांदणी तलावाला लागून पूर्वेकडे सजना बारव आहे. हि बारव मजबुत दगडी बांधकामाने तयार केली आहे. तिचा व्यास ९.९० मीटर असून खोली १३.७० मीटर आहे. विहिरीमध्ये आत उतरण्यासाठी पुर्वेकडून पायऱ्या आहे. विहीरीचे पाणी काढण्यासाठी विहीरीवर दोन मोट आहेत. विहिरीच्या उत्तर अंगाने दोन ओवऱ्या काढून स्नानगृहाची व्यवस्था केलेली दिसते. सजना बारवेच्या पश्चिमेस एक कारंजेही आढळते. या बारवचे बांधकाम राव जगदेवाने केले.[८] हि बारव निर्माण करण्याचा मुख्य उद्देश शेतीला पाणी पुरवठा करणे हा होता.

**४) पुतळा बारव :-** ही बारव लखुजी जाधवांच्याही पुर्वीची असुन तिचे बांधकाम १२ वे ते १३ व्या शतकात झाले आहे. बारव गोलाकार नसून कष्टकोनी दिसते. पुर्व-पश्चिम लांबी २०.७० मीटर असून पाण्यात उतरण्यासाठी पुर्व, पश्चिम व दक्षिणेकडून पायऱ्या काढलेल्या आहेत. याचे सर्व बांधकाम दगडी असून त्यावर अनेक सुबक आणि सुंदर मुर्ती कोरलेल्या आहेत. शिल्पाकृती हत्तीची रांग खोदून त्यावर स्तंभ खोदलेले आहेत. या बारववर कोरलेल्या गणपती, तीर्थकर इत्यादी मुर्ती लक्षणीय आहेत.[९] बारवच्या बाजुला असलेल्या शेतीला पाणी पुरवण्यासाठी या बारव ची निर्मीती केली असावी.

**५) समारोप :-** बुलडाणा जिल्हयाचे महात्त्व ओळखून इग्रंजांनी सुद्धा थंड हवेचे ठिकाण म्हणून त्याठिकाणी वास्तव केले होते, अशा या जिल्ह्यात शिवाजी महाराजाच्या माता जिजाबाई याच्या वडीलाचे राज्य होते फक्त त्यांनी राज्यच केले नाही. तर आपल्या जनतेच्या कल्याणाकरीता भारताचा मुख्य व्यवसाय असलेला शेती याकडे विशेष लक्ष दिले, फक्त लक्ष दिलेच नाही तर आपल्या जाहागीरीत संपन्नता नादांवी म्हणून पाण्याचे नियोजन केले. ज्याकाही वास्तू निर्माण केल्या त्यामध्ये स्थापत्य कला तर होतीच त्याच प्रमाणे ते पर्यटन स्थळही आहे. आज तो भाग दुलर्क्षीत असल्यामुळे लोक फक्त जिजाबाईचे जन्मस्थळ म्हणून १२ जानेवारीला या ठिकाणी येतात मात्र त्याठिकाणावरील वास्तु आज सुध्दा जगाला संदेश देऊ इच्छित याकडे सर्वांचे लक्ष गेले पाहीजे. राव जगदेवीरावांनी ज्या वस्तु निर्माण केल्या त्यापाठीमागे जनकल्याण हा उदेश होता. ऐवढेच नाहीतर मोती तलावामध्ये ज्या काही सुविधा केल्या त्या आपल्याला इतर कुठल्याही ठिकाणी दिसत नाही त्याकाळी कुठल्याही यंत्राचा शोध न लागता जी पाणी सोडण्याची झडपे होती ती प्रत्यक्ष बघितल्यानंतर त्याची कल्पना आपल्याला येते हे सर्व पाणी व्यवस्थापन हा त्याचा दुष्टीकोण त्या मधून दिसून येतो.

## सारांश

जागतीक पर्यटनाच्या दृष्टीने भारत एक महत्वाचे राष्ट्र आहे. बारमाही पर्यटनाचे एक महत्वाचे स्थळ म्हणून भारताला ओळखले जाते. त्यामध्ये बुलडाणा जिल्हा सुद्धा फार महत्वाचा मानला जातो. कारण या ठिकाणी लोणार हे जागतीक किर्ती स्थान आहे, शेंगाव हे महाराष्ट्राचे कुलदिपक मानले जाते. ज्या शिवरायानी हिंदवी स्वराज्याची स्थापना केली त्यांना प्रेरणा देणारी माता सिंदखेड राजा येथिल आहे हे बुलडाणा जिल्हयाचे भाग्यच म्हणावे लागले. अशा या सिंदखेड राजामध्ये ज्या जाधव घराण्याने आपले राज्य स्थापन केले त्या घराण्यातील राजांनी या ठिकाणी निर्माण केलेल्या वास्तु ह्या अद्वीतीय तर आहेच पण त्या ठिकाणी पाण्याचे व्यवस्थापन हे महत्वाचे समजले जाते.

लखुजी जाधवाचा राजवाडा हा स्थापत्य कलेच्या दृष्टीने महत्वाचा आहे. पण त्या राजवाड्यातील खोल्या थंड राहण्यासाठी केलेली व्यवस्था किती उत्कृष्ठ आहे हे सुध्दा महत्वाचे वैशिष्ट मानले पाहीजे. त्याच प्रमाणे राव जगदेवराव यानी निर्माण केलेला मोती तलाव हा बांधकामाच्या दृष्टीने तर महत्वाचा आहे त्याची स्थापत्य शैली बांधाऱ्याच्या भिंतीवरील गच्चीवरून केली जाई. त्याच प्रमाणे चांदणी तलावाचे बांधकाम व मध्यभागी बांधलेल्या खोल्या त्या ठिकाणी रात्रीच्या वेळी दिसणारे निसर्गाचे चित्र सजना बारवमध्ये बांधकाम व मोटीची व्यवस्था आज सुद्धा सुस्थीतीत दिसते पुतळा बारव आत उतरण्यासाठी केलेल्या पायऱ्याची व्यवस्था हे सर्व शेतकऱ्याला बारमाही पिक घेता यावे आमराया जगाव्यात फळझाडे विकसित व्हावेत शेतीला पाणी पुरवठा करता यावा गावात पिण्याच्या पाण्याची व्यवस्था व्हावी यासाठी केलेली हि सर्व व्यवस्था अद्वितीय मानली जाते.

## संदर्भ

१) प्रा. देशमुख मा. म. - शिवराज, पृ क्र. २२
२) सुडके नारायण जी., स्वयंभू आमचे शिवराय, सुमती लांडे, श्रीरामपूर, सप्टे २००० पृ. ३६
३) डॉ. पाटील लीला, शिवरायांच्या आऊसाहेब, विवेक पब्लिकेशन कोल्हापूर, प्रथम आवृत्ती १७ जून पृ. क्र. ०९
४) प्रा. राणा अशोक, छत्रपती शिवराय, प्रकाशक फुले आंबेडकर तत्त्वज्ञान संस्था द्वारा - ५,एस. मंगेश अपार्टमेन्ट धुळे पृ. क्र. २५
५) प्रा. डॉ. बाहेकर एस. ए. राजमाता राष्ट्रमाता जिजाऊ, कसब प्रकाशन, जळगाव, तृत्तीय आवृत्ती डिसेबर २००७ पृ. क्र. ९२
६) काळे या. मा. वऱ्हाडचा इतिहास भाग १ बुलडाण १९२४ पृ. क्र. ३३६
७) देशमुख विजय, सिंदखेडरांना पुरातत्व व वस्तु संग्राहालये विभाग, महाराष्ट्र शासन, १९८२ पृ. क्र. २२, २३
८) देशमुख विजय सिंदखेडरांना पुरातत्व व वस्तुसंग्राहालये विभाग, महाराष्ट्र शासन, १९८२ पृ. क्र. २३
९) प्रा. डॉ. बाहेकर एस. ए. राजमाला राष्ट्रमाता जिजाऊ, कसब प्रकाशन, जळगाव, तृत्तीय आवृत्ती ६ डिसेबर २००७ पृ. क्र. ९५